राहिले.

# मुलींची छेड काढणाऱ्या अठरा युवकांना अटक

कोल्हापूर, ता. ३ - कमला महाविद्यालय परिसरात मुलींची छेडछाड करताना पोलिस उपअधीक्षक दत्तात्रय मंडलिक व त्यांच्या खास पथकातील सहकाऱ्यांनी आज सकाळी साडेदहाच्या सुमारास १८ युवकांना ताब्यात घेतले.

पकडलेल्यांची नावे अशी : नीतिन गणपतराव रसाळ (वय १८, राजारामपुरी), रणधीर सर्जेराव जाधव (१८, दौलतनगर), गजानन रामचंद्र लोळगे (२०, उचगाव), कृष्णात वसंत गुरव (१९, आसुर्ले-पोर्ले), विजय रामचंद्र चोपडे (२०, बालिंगा), विलास रामा बागडी (१८, रुकडी), धैर्यशील धोंडिराम गुरव (२२, सांगवडे), अरविंद यशवंत (१९, आसुर्ले), अरविंद रामचंद्र खोतगे (१८, हलसवडे), शामराव दत्तात्रय कुरणे(१८, रुकडी), प्रकाश परशुराम पवार (१८, राजारामपुरी), विलास यशवंत चौगुले (१९, टाकाळा) गिरीश गणपतराव करगुत्तीकर (२२, तोरणानगर), महमद रफीक गोलंदाज (१८, उचगाव), विनय जगन्नाथ शेलार (१८, साळुंखेनगर), आनंदा दिनकर पाटील (१८, उचगाव), सरोज इकबाल नायकवडी (१८, राजारामपुरी) आणि हंबीर मारुती कदम (२१, उचगाव) अशी आहेत.

या युवकांना पकडण्यात खास पथकातील पोलिस हवालदार संभाजी साळोखे आणि जनार्दन उलपे, चंद्रकांत बागवान, बशिर पटेल व सर्जेराव आवळे यांनी भाग घेतला, असे पोलिसांनी सांगितले.